# शुक्रवार दिनांक १५/१२/२००९ रोजी निमा हाऊस, सातपूर, नाशिक-७ या ठिकाणी दुपारी ४.०० वाजता झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती च्या सभा क्रमांक १/४ चे इतिवृत्त.

--- ----------------------------------------

विषय क्र.१ः- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

विषय क्र.१ः- मागील सभा दिनांक १७/११/०९च्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

सदरचे इतिवृत्त सदस्य सचिव यांनी सभागृहात वाचून दाखविले असता त्यावर कोणाचीही हरकत नसल्यामुळे ते सर्वानुमत्ते मंजुर करुन कायम करण्यांत आले.

विषय क्र.२ नाशिक महानगरपालिका यांचेशी निगडीत समस्या :- सदर बाबतीत एमआयडीसी, सातपूर व अंबड क्षेत्रातील उद्योजकांच्या ज्या समस्या आहेत त्या सदर समितीच्या सभांमध्ये ब-याच कालावधी पासून चर्चेसाठी घेण्यांत येतात, त्यावर चर्चा होवून निर्णय सुध्दा घेण्यांत येतात. परंतु सदरच्या समस्यांमध्ये कोणताही बदल झालेला नाही ही बाब निदर्शनास आली असता औद्योगिक संघटनांच्या प्रतीनिधींनी तिव्र नाराजी व्यक्त केली यावर मा.अध्यक्षांनी उपस्थित संबंधीत यंत्रणांच्या अधिका-यांशी चर्चेअंती सांगितले की, उप आयुक्त (कर)श्री.आर.एम.बहीराम यांनी आयुक्त मनपा, नाशिक यांचे सह एमआयडीसी, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, पोलिस विभाग, औद्योगिक संघटना (निमा, आयमा, व नाईस) यांच्या अधिकारी / पदाधिका-यांची एक विशेष सभा जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा मनपा कार्यालयात पढील सभेच्या आत आयोजित करुन सदर सभे मध्ये खालील विषयांवर स्वतंत्रपणे सविस्तर चर्चा घडवून आणून निर्णय घेवून त्यांची अंमलबजावणी संबंधीत यंत्रणेने करणेसाठी विहित काल मर्यादा निश्चित करण्यांत यावी असे मागील सभेत ठरले होते. तथापी मनपाने सदरची सभा आयोजित न केल्याचे निदर्शेनास आल्याने सदरची सभा मनपाने ३१ डिसेंबरच्या आत आयैजित करावी, दरम्यान संबंधीतांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी असे मा.अध्यक्षांनी सांगितले. —

१.अतिक्रमणे कायम स्वरुपी हटविणे बाबत -- मनपा व एमआयडीसी अधिका-यांनी सांगितले की, सातपूर क्षेत्रातील बरीच अतिक्रमणे काढलेली असून अंबड क्षेत्रातील अतिक्रमणे पुढच्या आठवडयात काढली जातील.

२.चो-यांचा बंदोबस्त करणे बाबत -- अंबड पोलिस स्टेशनने सदर बाबतीत कोंबीग ऑपरेशन कार्यक्रम ८ दिवसात राबवावा.

३.संपूर्ण स्ट्रीट लाईट शनिवार सह सुरु राहतील अशी व्यवस्था करणे बाबत -- मनपा व महाविवि कंपनीचे प्रतिनिधींनी सांगितले की, सदर बाबतीत सर्व्हे करण्यांत आलेला असून १५ दिवसात १५० ते २०० पोल वरील लाईट सुरु होतील. तसेच जे नविन पोल टाकण्यांत आलेले आहेत त्यांच्यावरील फिटींगचे काम सध्दा लौकरात लौकर पर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

४.जकाती संबंधीच्या समस्या – कच्या मालावर जी अनामत रक्कम दयावी लागते ती सुरु ठेवावी पण या संदर्भात मनपाची जी अगाऊ परवानगी घ्यावी लागते या उद्योजकांच्या मागणी बाबत मनपाने नियमात दुरुस्ती करण्याबाबत योग्यती कार्यवाही करावी.

५.नियमित साफसफाई करुन आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत --- सातपूर व अंबड क्षेत्रात घंटया गाडया नियमीत येत नाहीत याबाबत मनपाच्या आरोग्य विभागाने तात्काळ उपाययोजना करावी. तसेच सदरच्या गाडया नियमीत येतात किंवा नाही याबाबत मनपाने अचानक तपासणी करावी, घंटा गाडी चालकांना सदरच्या क्षेत्रातील उद्योजकांच्या स्वाक्ष-या घेण्याची सक्ती करावी.

६.आनंदवल्ली पंपीग स्टेशन स्विच बंद चालू करण्याची व्यवस्था करुन २४ तास पाणी
पुरवठा मिळणे बाबत --- याबाबत मराविवि कंपनीने एमआयडीसीला तात्काळ नाहरकत पत्र दयावे व सदरची व्यवस्था एमआयडीस ने विनाविलंब करावी. पुढील सभेत हा विषय येता कामा नये.

कार्यवाही :- सर्व संबंधीत.

३) नाईस एरियातील उद्योग घटकांना बीसीसी मिळणे बाबत :-
या बाबतीत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी यांनी सांगितले की, सदर क्षेत्रातील घटकांना कोणत्याही प्रकारचे दंडात्मक शुल्क न आकारता बीसीसी देणे बाबतचा प्रस्ताव एमआयडीसीच्या संचालक मंडळाच्या सभेत अंतिम निर्णयासाठी लवकरच सादर केला जाणार आहे. या बाबत मा.अध्यक्षांनी सांगितले की, पाठपूरावा सुरु ठेवावा.

कार्यवाही –प्रादेशिक अधिकारी, / कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक.

४) सचिव, निमा यांना म.औ.वि.म. च्या अधिका-यांकडून वैयक्तिक आकसा पोटी त्रास होत असल्याबाबत --

मा. अध्यक्षांनी सांगितले की, सदर बाबतीत लवकरच चौकशी पूर्ण करण्याचे आदेश संबंधीत चौकशी अधिकारी यांना दिलेले आहे.

<u>कार्यवाही</u> :- मा.उप जिल्हाधिकारी, (निवडणूक) नाशिक.

५) भुखंड क्रमांक २८ एमआयडीसी, सातपूर येथील (फ्लॅटेड) इमारतीमधील गाळे धारकांच्या समस्या बाबत-- सदर बाबतीत आपत्कालीन बहीर्गमन मार्गा बाबत एमआयडीसी ने तात्काळ कार्यवाही करावी व या संदर्भात मुख्य अभियंता एमआयडीसी पुणे यांना जे पत्र पाठविलेले आहे त्याची प्रत तात्काळ मा.जिल्हाधिकारी यांचेकडे दयावी. तसेच एमआयडीसीने सदर क्षेत्रातील रस्ते दुरुस्ती / तयार करणेबाबत सदरचे रस्ते मनपाकडे तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत करण्यासाठी सोसायटीचे संमतीपत्र घेवून सदरचे रस्ते मनपाकडे हस्तांतरीत करावेत व पुढील कार्यवाही मनपाच्या प्रतिनिधींनी सभेत आश्वासन दिल्यानुसार करावी.

<u>कार्यवाही</u> :- प्रादेशिक अधिकारी, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी / मनपा, नाशिक/ निमा / संबंधीत गाळे धारक.

७) मे.जोटो ॲब्रेसिव्हज प्रा.लि. सी-११/४३, रोड ए, नाईस ऐरीया, सातपूर नाशिक. अनियमित विद्यूत पुरवठयामुळे होणा-या नुकसान भरपाई संदर्भात मार्गदर्शन मागणे बाबतचा घटकाचा अर्ज दिनांक ०१/०४/२००९.

सदर बाबतीत मराविवि कंपनी चे प्रतिनिधींनी सांगितले की, आता सदरचा प्रश्न सुटलेला आहे. यावर सदरचा विषय वगळण्यांत यावा असे ठरले.

८) मौजे लखमापूर शिवारातील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करुन मिळणे बाबत मे.हेक्झागॉन न्यूट्रीशन प्रा.लि. गट नंबर ९२, उनंदा नगर, लखमापूर, ता. दिंडोरी, जि.नाशिक या घटकाचा अर्ज दिनांक ३०/०७/२००९.

सदर बाबतीत सार्वजनिक बांधकाम खात्यास स्वतंत्र पत्र पाठवून कार्यवाही करणे बाबत कळवावे.

कार्यवाही :- जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.

९) एमआयडीसी सातपूर व अंबड क्षेत्रामधील मालमत्ता कर आकारणी बाबत मनपाकडून होत असलेल्या मोजणी बाबत.

सदर बाबतीत मा.अध्यक्षांनी सांगितले की, सदरचा वाद हा औद्योगिक/ रहिवाशी दराने आकारणी करणे बाबतचा असल्याचे दिसून येते. याबाबत उप आयुक्त (कर) मनपा, नाशिक यांनी वैयक्तिक लक्ष देवून तात्काळ उपाय योजना करावी. उद्योग घटकांकडे कर्मचारी पाठविणे आधी घटकांना पत्राव्दारे कळविण्यांत यावे.

कार्यवाही :- उप आयुक्त (कर) मनपा, नाशिक.

१०) गरजू छोटया उद्योजकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत --

याबाबत प्रथम प्रैदेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक यांनी जी सकारात्मक भुमीका घेवून आता पयैत जी कार्यवाही केलेली आहे त्याबाबत त्यांचे सर्व औद्योगिक संघटनामार्फत अभिनंदन करण्यांत आले. तसेच अंबड क्षेत्रातील ३० एकर जागे पैकी १० एकर जागेवर भुखंड पाडून सदरच्या उद्योजकांसाठी सुवर्ण लघु उद्योग योजना राबविणे बाबत औद्योगिक संघटनांकडे जो नियोजन आराखडा आहे तो त्यांनी प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी यांचेकडे दयावा व एमआयडीसीने भुखंड वाटप करतांना तो विचारात घ्यावा.

कार्यवाही:- प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी, औद्योगिक संघटना,नाशिक

## सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्या, यांचे प्रश्न :-

१) सिन्नर सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये सध्या नविन वीज कनेक्शन मिळत नाही त्याकामी जादा क्षमतेचे सबस्टेशन उभारण्याचे कामास वेग देणे बाबत..

सदर बाबतीत मराविवि कंपनीच्या उपस्थित अधिका-यांनी सांगितले की, सदर क्षेत्रातील स्टोन क्रेशरचा प्रश्न सूटलेला असून लवकरच विषय मार्गी लागेल त्यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, सदरील विषय विषय सुचितून वगळण्यांत यावा.

२) एम.एस.एफ.सी.ने जप्त केलेले उद्योग घटकांची विक्री करुन हस्तांतरण करतांना मुंबई कार्यालयाकडून होत असलेली दिरंगाई.त्यासाठी सद्याच्या स्पर्धेच्या काळात सुलभ कार्यपध्दतीने कामकाज करण्यासाठी सुचना करणे बाबत. :-

याबाबत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी यांनी सांगितले की, सदर बाबतीत योग्य प्रकारे सुलभता आणण्यात आलेली असून फक्त कामगार विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यांत यावे अशी सधारणा केलेली आहे. यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, सदरील विषय विषय सुचितून वगळण्यांत यावा.

३) ट्रक टर्मीनल व डंपीग यार्ड, एमआयडीसी सिन्नर. :-

सदर बाबतीत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक यांनी सांगितले की, मध्यवर्ती ठिकाणचे भुखंड एकत्रित करणे, त्यांचा उपयोग करणे बाबतचा बदल करणे या साठी प्रस्ताव मुख्यालयास सादर केलेला असून प्राथमीक कार्यवाही झालेली तसेच अधिवेशना नंतर मंजूरी मिळेल. यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, सदरची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी.

कार्यवाही :- प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक.

## मालेगांव तालुका ग्रामीण यंत्रमाग समिती, मालेगांव, यांचेकडील प्रश्न :-

विषय क्र.१ :-सायने गावा जवळच्या एमअयडीसी क्षेत्रातील भुखंड वाटप करणे बाबत तसेच सायने एमअयडीसी च्या विकासाबरोबर मोसम नदीच्या पश्चिम भागात दुसरी एमअयडीसी स्थापन व्हावी त्यासाठी प्राथमिक अहवाल तयार करणे बाबत.

सदर बाबतीत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी यांनी सांगितले की, सायने गावा जवळच्या एमआयडीसी क्षेत्रातील भुखडांचा दर कमी करणे बाबत महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु असुन एकूण ६४ भुखंड असून ३६ अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यापैकी ३ भुखंड वाटप झालेले असून मोसम नदीच्या पश्चिम भागात दुसरी एमआयडीसी स्थापन करण्याबाबतच्या जागे संबंधी सर्वोच्च न्यायालयाचा जैसे-थे आदेश आहे. यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, योग्यती कार्यवाही सुरु ठेवावी.

सदर बाबतीत मा.अध्यक्षांनी सांगितले की, या बाबत चर्चो मालेगांव येथील झूम मिटींग मध्ये घेण्यांत येईल.

कार्यवाही :- प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. व सायने
औद्योगिक सहकारी वसाहत, मालेगांव.

विषय क्र. :- २

मालेगांव औद्योगिक क्षेत्र मौजे सायने बु.ता.मालेगांव जि. नाशिक येथील खडीक्रेशर काढून टाकणेबाबत.

सदर बाबतीत खडीक्रेशर साठी मा. जिल्हाधिकारी नाशिक यांचे कार्यालयाकडून खडी पट्टा (क्वारी लिज) मंजूर झालेले असल्याने संबंधीत घटकाने विज पुरवठा बंद करणे विरुध्द हरकत घेतलेली आहे. त्यामुळे सदरचे विज कनेक्शन बंद करता येवू शकत नाही तसेच मा. जिल्हाधिकारी, कार्यालय, नाशिक यांचेकडून सदर खडी क्रेशर धारकाचा खडीपट्टा रद् झाल्यास सदरचे विज कनेक्शन बंद करता येवू शकेल असे अधिक्षक अभियंता, (मंडल-ग्रा) नाशिक यांनी पत्र क्र.४८७० दिनांक ३०/०७/२००९ अन्वये कळविले आहे. असे सदस्य सचिव यांनी सांगितले असता मा. अध्यक्षांनी सांगितले की, एमआयडीसीने सदर ठिकाणी वस्त्रोद्योग पार्क विकसीत करण्याचे काम सुरु ठेवावे, संबंधीत घटकाचा खडीपट्टा रद् करण्याची कार्यवाही करणे बाबत योग्य वेळी निर्णय घेण्यांत येईल.

सदर बाबतीत मा.अध्यक्षांनी सांगितले की, या बाबत चर्चा मालेगांव येथील झूम मिटींग मध्ये घेण्यांत येईल.

कार्यवाही :- अधिक्षक अभियंता, (मंडल-ग्रा) नाशिक / प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक.

आयत्या वेळचे विषय :-

१. भूयारी गटार योजना -- सदर बाबतीत सविस्तर चर्चाअंती मा.अध्यक्षांनी सांगितले की, विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून अंबड व सातपूर पोलिस स्टेशनने आजच्या सभेचा संदर्भ देवून आयुक्त मनपा यांना संबंधीत ठेकेदाराला आवश्यक त्या सुचना देणे बाबत तात्काळ पत्र पाठवावे.

कार्यवाही :- सातपूर / अंबड पोलिस स्टेशन, मनपा, नाशिक.

२. सायने बु. औद्योगिक वसाहत, मालेगांव येथील मराविवि कंपनीचे सब स्टेशन मोडकळीस आलेले आहे याबाबत मराविवि कंपनीने तात्काळ कार्यवाही करावी.

३. या समितीमध्ये झालेल्या निर्णयांचा पाठपूरावा करणेसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र / निमा / आयमा/ नाईस चे प्रतिनिधी यांनी सभेच्या एक आठवडा आगोदर एकत्रीत बसून पाठपूरावा करावा.

४. पुढील सभा अनुक्रमे सिन्नर व मालेगांव येथे आयोजित कराव्यात. सदरच्या सभांमध्ये फक्त त्या ठिकाणचेच विषय चर्चीले जावेत.

शेवटी सदस्य सचिव, यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

(डॉ. भास्कर.गो.पालवे)
महाव्यवस्थापक, जिउके व
सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, नाशिक.

(पी. वेलरासू)
जिल्हाधिकारी,
व अध्यक्ष, जिल्हा उद्योग मित्र समिती नाशिक.

शुक्रवार दिनांक १५/१२/२००९ रोजी निमा हाऊस, सातपूर, नाशिक-७ या ठिकाणी दुपारी ४.०० वाजता झालेल्या स्थानिक लोकांना रोजगार समितींच्या सभेचे इतिवृत्त.

विषय क्र.१ः- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
विषय क्र.१ः- मागील सभा दिनांक १७/११/०९च्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

सदरचे इतिवृत्त सदस्य सचिव यांनी सभागृहात वाचून दाखविले असता त्यावर कोणाचीही हरकत नसल्यामुळे ते सर्वानुमत्ते मंजुर करुन कायम करण्यांत आले.

विषय क्र.२ स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणे बाबत.--

सदर वेळेस संबंधीत कायदया बाबतची सविस्तर माहिती सदस्य सचिव यांनी सभागृहात देवून नाशिक जिल्हयातील लघु मध्यम व मोठया सर्व उद्योग घटकांनी त्यांच्या घटकांमध्ये पर्यवेक्षकीय क्षेंणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहीत इतर क्षेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोंक-यामध्ये प्राधान्याने घेणे बाबत आवश्यक आहे, तसेच या संदर्भात उद्योग घटकांनी जिल्हा उद्योग केंद्राकडे जे वार्षीक अहवाल सादर करणे आवश्यक आहे याबाबतची माहिती देवून यासंदर्भात शासनाच्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी जिल्हयातील सर्व औद्योगिक संघटनांनी सहकार्य करावे असे सांगितले. त्यावर मा.अध्यक्षांनी आवाहान केले की, सर्व औद्योगिक संघटनांनी सदर धोरणाची जाणीवपूर्वक नोंद घेवून शासनास सहकार्य करावे.

कार्यवाही सर्व औद्योगिक संघटना, नाशिक.

विषय क्र.३ :- आयत्या वेळचे विषय —

१. महिला व बाल विकास विभागा मार्फत कार्यरत असलेल्या नाशिक जिल्हयातील निरीक्षणगृह, बालगृह या संस्था मधील मुलामुलींचे पुनर्वसनाबाबत- सदर बाबतीत संबंधीत विभागाने पुरविलेली यादी मागील सभेतच औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांना देण्यांत आली होती व त्यावर मा.अध्यक्षांनी आवाहन केले होते की, सदर यादीतील महिला / मुलांना सातपूर व अंबड क्षेत्रातील उद्योग घटकामध्ये तात्काळ नोक-या उपलब्ध करुन दिल्या जातील असे प्रयत्न औद्योगिक संघटनांनी करावेत. सदर बाबतीत औद्योगिक संघटनांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न होण्याची गरज आहे याची नोंद घेवून कार्यवाही करावी असे पन्हा आवाहन मा.अध्यक्षांनी केले.

कार्यवाही :- औद्योगिक संघटना.

शेवटी सदस्य सचिव, यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

(डॉ. भास्कर.गो.पालवे)
महाव्यवस्थापक, जिउके व
सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय स्थानिक लोकांना रोजगार समिती.

(पी. वेलरासू)
जिल्हाधिकारी व अध्यक्ष,
जिल्हास्तरीय स्थानिक लोकांना रोजगार समिती.

शुक्रवार दिनांक १५/१२/२००९ रोजी निमा हाऊस, सातपूर, नाशिक-७ या ठिकाणी दुपारी ४.०० वाजता झालेल्या जिल्हास्तरीय आजारी उद्योग पूनरुज्जीवन समितीच्या सभेचे इतिवृत्त.

--- ---------------------------------------

विषय क्र.१ः- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

विषय क्र.१ः- मागील सभा दिनांक १७/११/०९च्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

सदरचे इतिवृत्त सदस्य सचिव यांनी सभागृहात वाचून दाखविले असता त्यावर कोणाचीही हरकत नसल्यामुळे ते सर्वानुमत्ते मंजुर करुन कायम करण्यांत आले.

विषय क्र.२ आजारी उद्योग घटकांचे प्रस्ताव पाठविणे बाबत –

सदर वेळेस आजारी उद्योग प्रमाणपत्र देणे बाबत एकही प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राकडे प्राप्त झालेला नाही असे सदस्य सचिव यांनी सांगितले व संबंधीत घटकांनी त्यांचे वित्तीय संस्थेकडून नर्सीग प्रोग्राम बाबत ई-प्रपत्रामध्ये प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून जिल्हा उद्योग केंद्राकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावेत असे फेर आवाहन केले. तसेच महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व मुलभुत सुविधा धोरण २००६ नुसार ज्या औद्योगिक आजारी लघु, मध्यम व मोठया उद्योगांचे पुनरुज्जीवन शक्य नाही अशा औद्योगिक घटकांना सुलभ निर्गमनाचा पर्याय म्हणून विशेष अभय योजना (स्पेशल ॲमनेस्टी स्कीम) म्हणून एक रक्कमी परतावा योजनेच्या शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट २००९ बाबत सविस्तर माहिती सभागृहास देण्यांत येवून औद्योगिक संघटनांनी याबाबत अशा प्रकारच्या घटकांना लाभ मिळवून देणेसाठी प्रयत्न करावेत असे सांगितले.

कार्यवाही सर्व औद्योगिक संघटना, नाशिक.

शेवटी सदस्य सचिव, यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

(डॉ. भास्कर.गो.पालवे)
महाव्यवस्थापक, जिउके व
सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय आजारी उद्योग पूनरुज्जीवन समिती.

(पी. वेलरासू)
जिल्हाधिकारी व अध्यक्ष,
जिल्हास्तरीय आजारी उद्योग पूनरुज्जीवन समिती.